।। श्री ।।

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

कष्ट करण्याची लाज बाळगू नका
कारण जो लाजला तो संपला

अहिल्यानगर | बुधवार, दि. २१ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक १०५ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# ५०० कोटींचा आरोप सिद्ध करा

## मनोज जरांगेचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना थेट आव्हान । नारायण गडावर दसरा मेळावा

**बीड । वीरभूमी –** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी नारायण गडावरील मेळाव्यात ५०० कोटी रुपयांच्या व्यवहाराचा उल्लेख करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर सवाल उपस्थित केले. या आरोपाबाबत शिंदे यांनी जाहीरपणे उत्तर द्यावे, अशी मागणी जरांगे यांनी केली. दसरा मेळाव्यात किंवा दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत या प्रश्नावर भूमिका स्पष्ट करावी, असे आव्हानही त्यांनी दिले. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला सुरुवात झाली आहे.

नारायण गडावरील भाषणात मनोज जरांगे पाटील यांनी थेट एकनाथ शिंदे यांना उद्देशून प्रश्न उपस्थित केला. भाजपच्या केंद्रातील आणि राज्यातील काही मोठ्या नेत्यांना मनोज जरांगे यांना ५०० कोटी रुपये द्यायचे असल्याचे सांगण्यात आले होते का? तसेच, श्रीकांत शिंदे यांनी ही रक्कम आणून दिल्याची चर्चा आहे का, असा सवाल त्यांनी केला.

या प्रकरणावर मौन न बाळगता शिंदे यांनी स्पष्ट उत्तर द्यावे, अशी मागणी जरांगे यांनी केली. पैसे दिले असतील तर ते मान्य करावे आणि दिले नसतील तर तसे जाहीरपणे



सांगावे, असे ते म्हणाले. आपली बदनामी करण्यासाठी अशा प्रकारचे आरोप किंवा चर्चा पसरवली जात आहे का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

५०० कोटी रुपयांच्या रकमेचा उल्लेख करत जरांगे यांनी उपरोधिक शब्दांत आपली भूमिका मांडली. एवढी मोठी रक्कम नेमकी किती असते, याची कल्पना लोकांनी करावी, असे ते म्हणाले. आपण आयुष्यात एकाच वेळी पाच हजार रुपयेही पाहिले नसल्याचे सांगत त्यांनी या व्यवहाराच्या चर्चेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

जर आपल्याला खरोखरच ५०० कोटी रुपये मिळाले असते, तर दुष्काळाचा सामना करणाऱ्या शेतकरी बांधवांना मदत केली नसती का, असा सवाल जरांगे यांनी केला. शेतकरी संकटात असताना एवढी मोठी रक्कम स्वत:कडे ठेवण्याऐवजी ती गरजू लोकांना दिली असती, असा युक्तिवाद त्यांनी आपल्या भाषणात केला.

मनोज जरांगे पाटील यांनी ५०० कोटी रुपयांच्या व्यवहाराचा मुद्दा उपस्थित करत एकनाथ शिंदे यांच्याकडे जाहीर स्पष्टीकरण मागितले आहे. या आरोपांमागील सत्य काय, याबाबत अधिकृत भूमिका समोर येणे महत्त्वाचे आहे.

## SPOT NEWS

### राजौरीमध्ये लष्कराकडून दहशतवाद्यांचा तळ उद्ध्वस्त

**राजौरी –** जम्मू-कश्मीरमधील राजौरी जिल्ह्यात लष्कराने सोमवारी शोध मोहिम राबवत एका गुहेतील दहशतवाद्यांचा तळ उद्ध्वस्त केला. या कारवाईत सुरक्षा दलांनी शस्त्रे आणि दारुसाठा जप्त केला. अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरक्षा दलांनी कोटरांका तहसीलच्या पंच गब्बर परिसरातील चोर हिल भागात सुरक्षा दलांनी संयुक्त शोध मोहीम राबवली. गुप्त माहितीच्या आधारे लष्कराच्या ६० राष्ट्रीय रायफल्सच्या जवानांनी संबंधित जंगल परिसराला सोमवारी सायंकाळी वेढा गालत कसून शोध मोहीम राबवली. शोध मोहिमेदरम्यान, जवानांना जंगलात एक नैसर्गिक गुहा सापडली, जिथे दहशतवाद्यांचा तळ होता. या गुहेतून अंडर-बॅरल ग्रेनेड लाँचरचे नऊ ग्रेनेड्स, एक एके-४७ मॅगझिन आणि एके-४७ रायफलच्या १८ गोळ्या जप्त करण्यात आल्या. जप्त केलेला दारूगोळा ताब्यात घेण्यात आला असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित परिसरात शोध मोहीम सुरू आहे.

### विमान दरवाढीवर सरकारचे थेट नियंत्रण नाही

**नवी दिल्ली –** केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की, नव्या नियमांनुसार विमान कंपन्यांच्या भाड्यावर थेट नियंत्रण ठेवले जाणार नाही. सूत्रांच्या माहितीनुसार, विमान कंपन्या मागणी आणि उपलब्ध आसनांच्या आधारे भाडे निश्चित करू शकतील. मात्र, नैसर्गिक आपत्ती किंवा आणीबाणीसारख्या परिस्थितीत प्रवाशांना जास्त पैसे मोजावे लागू नयेत, यासाठी सरकारकडे भाडे निश्चित करण्याचा अधिकार असेल. नव्या नियमांनुसार, विमान कंपन्यांना विमानाच्या भाड्याची माहिती एक महिना आधी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाला (डीजीसीए) द्यावी लागेल. ही माहिती त्यांच्या संकेतस्थळावरही प्रदर्शित करावी लागेल. कोणतीही विमान कंपनी निश्चित मर्यादेपेक्षा जास्त भाडे आकारणार नाही, यावर डीजीसीए देखरेख ठेवेल. यापूर्वी केंद्र सरकारने शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले होते की, विमान कंपन्यांकडून आकारल्या जाणा-या मनमानी भाड्याला आळा घालण्यासाठी दोन आठवड्यांत नवे नियम लागू केले जातील.

## पुढील रणनिती दिवळीनंतर आखणार : दिपके

**नवी दिल्ली । वीरभूमी –** कॉक्रोच जनता पार्टीचे आशुतोष रांका आणि सौरभ दास यांची न्यायालयीन कोठडी वाढवण्यात आली आहे. त्यांचे प्रकरण क्राइम ब्रँचकडे सोपवण्यात आले आहे. दोघांना जामीन देण्यात हेतूपूर्वक उशीर केला जात असल्याचा आरोप कॉक्रोच जनता पार्टीने केला आहे. त्यामुळे अभिजीत दिपकेहे दोघे बाहेर आल्यानंतरच पुढील रणनिती आखणार असल्याचे स्पष्ट करीत दिवाळीनंतर पुढील रणनिती ठरविण्यात येणार असल्याची माहिती दिपके यांनी दिली.

कॉक्रोच जनता पार्टीन १० ऑक्टोबर रोजी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आंदोलन केले. परंतु विमानातच आशुतोष रांका, सौरभ दास आणि अभिजीत दिपकेंना यांना अटक करण्यात आली. त्यानंतर आशुतोष रांका, सौरभ दास याना जंतर मंतर झेंडा फडकवणे प्रकरणात ५ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत पाठवलं. यामुळे कॉक्रोच जनता पार्टीने कनॉट प्लेसवर तिरंगा फडकवण्याची घोषणा केली होती. त्यावेळी दिपकेंना पोलिसांनी ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर दिपकेंना पोलिसांनी ताब्यात घेतले. परंतु त्यांची दुस-या दिवशी सुटका करण्यात आली. दिल्ली पोलिसांनी आशुतोष रांका, सौरभ दास यांचे प्रकरण क्राइम ब्रँचकडे सोपवण्यात आले आहे. दोघांची न्यायालयीन कोठडी वाढवण्यात आली आहे. त्यांच्याविरोधात कनॉट प्लेस पोलिस स्टेशनमध्ये भारती. न्याय संहितेच्या विविध कलमाअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तसेच संसद मार्ग पोलीस स्टेशनमध्येही त्यांच्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आला आहेत.

कॉक्रोच जनता पार्टीने अद्याप कोणत्याही आंदोलनाची घोषणा केलेली नाही. दिपकेंनी रविवारी स्पष्ट केले की, ते सध्या आशुतोष रांका, सौरभ दास यांच्या सुटकेची वाट पाहत आहेत'. त्यांनी पुढे म्हटले की, आशुतोष रांका, सौरभ दास यांची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर पुढील रणनीती निश्चित केली जाईल. आम्ही काही दिवसांत पाहिले की, आम्ही आंदोलन केल्यानंतर कशाप्रकारे पोलिस बेकायदेशीररित्या कारवाई करत आहे. आमच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेत आहे. एक प्रकारे सरकार आम्हाला घाबरवण्याचा प्रयत्न करत आहे. दीपकेंनी पुढे सांगितलं की, आता कारवाई प्रकरणी वकिलांचा सल्ला घेत आहे. दिपकेंनी शनिवारी वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांचा सल्ला घेतला. तर त्यांनी स्पष्ट केलं की, त्यांनी रविवारपर्यंत सौरभ दास आणि आशुतोष रांका यांची सुटका केली नाही, तर ते कायदेशीर करणार आहेत. दोघांना हेतूपर्वक जामीन देण्यात दिरंगाई केली जात असल्याचा आरोप दिपकेंनी केला आहे. त्यांच्या सुनावणीत अडथळा निर्माण करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## फ्रान्ससारखे प्रयत्न भारतातही सुरू

### देशातील आंदोलनावर मोहन भागवत यांचे भाष्य । नागपूर येथे दसरा मेळावा

**नागपूर । वीरभूमी –** दसऱ्यानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा नागपुरात विजयादशमी सोहळा पार पडत आहे. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी विजयादशमीनिमित्त 'शस्त्रपूजन' केले. डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या स्मृतीस्थळावर पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी आपल्या भाषणात त्यांनी देशात सध्या सुरू असलेल्या आंदोलनावर भाष्य केले.

मोहन भागवत म्हणाले की, पश्चिमेकडून एक 'वादळ' उठले आहे आणि त्याबाबत सावध राहणे आवश्यक आहे. कारण फ्रान्स आणि अल्बेनियामध्ये घडणा-या घटना जग पाहत आहे आणि भारतातही असेच प्रयत्न केले जात आहेत. परंतु अशा प्रकारच्या अयोग्य वर्तनाला भारतात स्थान नसावे. लोकशाहीत निदर्शने होणे ही एक स्वाभाविक गोष्ट असली, तरी त्यावर उपाय समाजातूनच शोधले पाहिजेत. कोणत्याही निदर्शनाचा




उद्देश हा तोडगा काढणे हाच असावा. काही लोक केवळ स्वस्त लोकप्रियतेसाठी इतरांना भडकवण्याचा प्रयत्न करत असतात, असा आरोप भागवत यांनी केला.

मोहन भागवत म्हणाले की, आपण भारताचे लोक एक आहोत. आपली एकता नैसर्गिक आहे आणि ती हृदयापासून निर्माण होते. हा कोणताही व्यवहार किंवा करार नाही. ही कोणतीही अटींवर आधारित अशी व्यवस्था नाही, जिथे कोणी असे म्हणू शकेल की, 'जर मला बदल्यात काही मिळाले तरच मी भारताचा आहे, अन्यथा नाही.' खरं तर आपली एकता बिनशर्त आहे. भारताकडून आपल्याला काही मिळो किंवा न मिळो, आपल्याकडे जे काही आहे, ते सर्व भारताचेच आहे.

जेव्हा आम्ही संघामध्ये 'हिंदू भावने'ला बळकट करण्यासाठी एक संघटित आणि सशक्त हिंदू समाज घडवण्याबद्दल बोलतो, तेव्हा त्याचा अर्थ इतर धर्मांबद्दलचा परस्पर आदर किंवा राष्ट्रीय एकता यांच्या विरोधात जाणे असा अजिबात नाही.

हिंदू मानसिकता आणि चारित्र्य मुळातच सर्वसमावेशक असल्याने आणि सर्वांना सामावून घेणारे असल्याने हा प्रयत्न प्रत्यक्षात आपली भावनिक एकता, सदिच्छा आणि नैतिक अखंडता अधिक दृढ करतो. याच मूल्यांपासून (संस्कारांपासून) प्रेरित होऊन, कॅप्टन स्मित मच्छार यांनी अलीकडे जे कृत्य केले, ते पूर्णपणे स्वाभाविक होते. अशा परिस्थितीत कसे वागावे, याचे कोणतेही विशेष प्रशिक्षण त्यांना दिलेले नव्हते. उलट त्या कसोटीच्या क्षणी त्यांच्यामध्ये रुजलेली परंपरा आणि मूल्ये आपोआपच समोर आली, असे म्हणत मोहन भागवत यांनी स्मित मच्छार यांचे कौतुक केले.

# देशाचा अनादर करणारे तरुण नकोत!

## पंकजा मुंडेंचे 'Gen Z' तरुणाईला थेट आवाहन । सावरगाव येथील भगवानभक्ती गडावर दसरा मेळावा

**बीड । वीरभूमी –** महाराष्ट्राच्या राजकारणात दसरा मेळाव्यांच्या माध्यमातून नेत्यांची भाषणे आणि राजकीय संदेश चर्चेत असतात. भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी भगवान गडावरील दसरा मेळाव्यात तरुण पिढी, देशभक्ती, जातीपातीचे राजकारण आणि दुष्काळाच्या परिस्थितीवर आपली भूमिका मांडली. देशाचा आदर करणारी आणि विधायक काम करणारी तरुण पिढी घडण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर समाजात जातीच्या भिंती उभ्या करण्याऐवजी माणसांमध्ये प्रेम आणि एकोपा वाढवण्याचे आवाहन केले.

भगवान गडावरील दसरा मेळाव्यात समर्थकांना संबोधित करताना पंकजा मुंडे यांनी जगभरातील संघर्ष आणि अस्थिरतेचा उल्लेख केला. पॅरिस आणि फ्रान्समधील परिस्थितीचा संदर्भ देत त्यांनी रशिया-युक्रेन आणि इराणमधील युद्धांचाही उल्लेख केला. देशात देशभक्तीची भावना जपणारी आणि देशाचा आदर करणारी तरुण पिढी घडली पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

आपल्याला स्वतःचा देश जाळणारे तरुण नकोत, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले. माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या विचारांचा संदर्भ देत, देशासाठी काम करणारे आणि समाजाप्रती बांधिलकी जपणारे कार्यकर्ते तयार होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

आजची तरुण पिढी म्हणजेच जनरेशन झेड (Gen Z) असून, या पिढीने नेतृत्व करताना मुद्द्यांवर आधारित भूमिका घ्यावी. नेतृत्व हे विचार आणि प्रश्नांच्या आधारे व्हावे, संघर्ष आणि हिंसेच्या मार्गाने नव्हे, असा संदेशही पंकजा मुंडे यांनी दिला.

पंकजा मुंडे यांनी आपल्या भाषणात जातीपातीच्या राजकारणावरही जोरदार भाष्य केले. राज्यात दुष्काळाचे संकट असताना समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न होऊ शकतात. मात्र, अशा परिस्थितीत लोकांमध्ये भिंती निर्माण होऊ न देता एकोपा टिकवणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्याला जातीच्या भिंती मोडून काढायच्या आहेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. जातीपातीच्या आधारावर स्वतःचे राजकीय स्थान निर्माण करू पाहणाऱ्यांना भविष्यात यश मिळणार नाही, असेही त्या म्हणाल्या. समाजाला योग्य दिशा देण्यासाठी सुशिक्षित आणि प्रशिक्षित नेतृत्वाची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

राजकारणात केवळ द्वेष आणि विखार पसरवण्याऐवजी ठोस अजेंडा, विकासाची दृष्टी आणि समाजासाठी काम करण्याची तयारी असली पाहिजे, असे मत पंकजा मुंडे यांनी व्यक्त केले.

भाषणात पंकजा मुंडे यांनी अंतरवाली गावाचाही उल्लेख केला. हे गाव आपण दत्तक घेतले असून, त्याच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. बीड जिल्ह्याप्रमाणेच अंतरवालीवरही आपले प्रेम असून, गावागावांत प्रेम आणि सामाजिक सलोखा वाढवण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्या म्हणाल्या.

त्यांच्या या विधानातून ग्रामीण भागातील विकास आणि सामाजिक एकतेला त्यांनी दिलेले महत्त्व अधोरेखित झाले. समाजातील वेगवेगळ्या घटकांमध्ये समन्वय निर्माण करून विकासकामांना गती देण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रात दुष्काळाचे संकट असताना शेतकरी आणि पशुधनाला मदत मिळणे आवश्यक असल्याचे पंकजा मुंडे यांनी सांगितले. यापूर्वीही दुष्काळी परिस्थिती हाताळल्याचा उल्लेख करत, यावेळीही संकटाचा सामना करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) निधीतून चारा अनुदानासाठी प्रयत्न केले जातील. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत काम करून दुष्काळग्रस्तांना मदतीचा आधार देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

याशिवाय, नदी संवर्धनासाठीही काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. नदीचे संवर्धन आणि जलसंधारणाच्या




माध्यमातून ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी करण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे त्या म्हणाल्या.

पंकजा मुंडे यांच्या भगवान गडावरील दसरा मेळाव्यातील भाषणात देशभक्ती, तरुणांचे नेतृत्व, जातीपातीच्या राजकारणाला विरोध आणि दुष्काळ निवारण हे मुद्दे केंद्रस्थानी राहिले. समाजात फूट पाडण्याऐवजी एकोपा वाढवण्याचे आवाहन करत त्यांनी विकासकामांवर भर दिला.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा अनुदान आणि नदी संवर्धनाबाबत त्यांनी व्यक्त केलेली भूमिका महत्त्वाची ठरली आहे. आता या घोषणांच्या अनुषंगाने प्रत्यक्षात कोणते उपक्रम राबवले जातात आणि दुष्काळग्रस्त भागांना किती मदत मिळते, याकडे लक्ष लागले आहे.

SPOT NEWS

## सन फार्मा विद्यालयात अंधश्रद्धे विरोधात विज्ञानवादी विचारांचा जागर

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

बालवयात अंधश्रद्धा दूर करून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याच्या उद्देशाने सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) वतीने 'विज्ञान जागर' कार्यक्रम घेण्यात आला. विविध वैज्ञानिक प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला चालना देण्यात आली. अंनिसचे अहिल्यानगरचे प्रधान सचिव टी. के. जगधने यांनी प्रास्ताविकात दैनंदिन जीवनातील विज्ञानाचे महत्त्व आणि अंधश्रद्धेचे दुष्परिणाम सांगितले. प्रत्येक घटनेमागील कार्यकारणभाव शोधण्याची सवय विद्यार्थ्यांनी लावून घ्यावी, असे त्यांनी आवाहन केले. यावेळी प्राचार्य रावसाहेब सातपुते, विनायक सापा, टी. के. जगधने व आरएसपी अधिकारी राजेंद्र धस यांनी कै. नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण केली. अंनिसचे जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा यांनी विविध प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादर करत तथाकथित चमत्कारांमागील वैज्ञानिक सत्य उलगडले. बुवाबाजीमध्ये हातचलाखी व विविध क्लृप्त्यांचा वापर कसा केला जातो, हे प्रयोगांतून दाखवून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष संपतराव बारस्कर यांनी उपक्रमाचे कौतुक करून भोंदू व्यक्तींपासून समाजाचे संरक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी जागरूक राहण्याचे आवाहन केले. आरएसपी अधिकारी राजेंद्र धस यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या विचारपद्धतीत सकारात्मक बदल घडण्यास मदत होत असल्याचे सांगितले. कार्यक्रमास प्राचार्य रावसाहेब सातपुते, ससे, बारस्कर, श्रीमती महांडुळे, भोगे मॅडम यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सिद्धी बाग बुद्ध विहारात अभिवादन

**अहिल्यानगर । वीरभूमी-**

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सिद्धी बाग परिसरातील बुद्ध विहारात भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी बुद्धांच्या शांती, करुणा, समता आणि बंधुतेच्या विचारांचे स्मरण केले. नगरसेवक सुरेश बनसोडे, मनपाचे जल अभियंता परिमल निकम, निवृत्ती आरू, प्रा. जयंत गायकवाड, विलास साठे, अमित काळे, सुहास शिरसाठ, महेश भोसले, दीपक अमृत, विशाल भिंगारदिवे, कौशल गायकवाड, अजय पाखरे, निखिल साळवे यांच्यासह विविध पदाधिकारी व अनुयायी उपस्थित होते. सुरेश बनसोडे म्हणाले, धम्मचक्र प्रवर्तन दिन हा भारतीय इतिहासातील महत्त्वाचा दिवस आहे. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक घटनेतून त्यांनी समाजाला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवतेचा मार्ग दाखविला. बुद्धांचा शांती, करुणा, प्रज्ञा आणि अहिंसेचा संदेश तसेच डॉ. आंबेडकर यांचा सामाजिक समता व न्यायाचा विचार आजही मार्गदर्शक आहे. केवळ जयंती किंवा स्मृतिदिन साजरे न करता त्यांच्या विचारांचे आचरण करणे आवश्यक आहे. शिक्षण, सामाजिक समता आणि मानवतेच्या मूल्यांना प्राधान्य देणे हीच महामानवांना खरी आदरांजली ठरेल, असेही बनसोडे यांनी सांगितले.कार्यक्रमातून बुद्ध आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांना उजाळा देत समताधिष्ठित समाजनिर्मितीचा संकल्प करण्यात आला.

# भगवानगडाच्या चतुर्थ महंतपदी कृष्णा महाराज शास्त्री

### भगवानगडाच्या अमृत महोत्सवी वर्षात न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या हस्ते उत्तराधिकाऱ्यांची विधिवत नियुक्ती

**पाथर्डी । वीरभूमी-**

सन १९५१ साली विजयादशमीच्या दिवशी श्रीक्षेत्र भगवानगडाचे संस्थापक ऐश्वर्यसंपन्न संत श्री भगवानबाबा यांनी गडाची स्थापना केली. भगवानगडाच्या स्थापनेला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने अमृत महोत्सवी वर्ष साजरे होत आहे. या ऐतिहासिक वर्षातच दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर ह.भ.प. श्री. कृष्णा महाराज शास्त्री यांची भगवानगडाच्या चतुर्थ महंतपदी विधिवत नियुक्ती करण्यात आली. विद्यमान मठाधिपती न्यायाचार्य डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्री यांच्या हस्ते कृष्णा महाराज शास्त्री यांना भगवानगडाच्या गादीवर विराजमान करण्यात आले.

महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांनी सुमारे दोन वर्षांपूर्वीच ह.भ.प. श्री. कृष्णा महाराज शास्त्री यांची आपले उत्तराधिकारी आणि भगवानगडाचे चतुर्थ महंत म्हणून निवड केली होती. त्यानुसार दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर हा नियुक्ती सोहळा पार पडला.

ह.भ.प. श्री. कृष्णा महाराज शास्त्री यांनी श्रीक्षेत्र भगवानगडावरील ज्ञानेश्वरी विद्यापीठात तब्बल बारा वर्षे वास्तव्य करून न्यायाचार्य डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानेश्वरी तसेच विविध धार्मिक ग्रंथांचे अध्ययन केले. विद्या पारंगत झाल्यानंतर एकनाथवाडी ग्रामस्थांच्या आग्रहास्तव त्यांच्याकडे निरंजन संस्थानच्या महंतपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. सुमारे तीन वर्षे त्यांनी निरंजन संस्थानचे महंत म्हणून काम पाहिले.

भगवानगडाच्या महंतपदी त्यांची घोषणा झाल्यानंतर दोन वर्षांपूर्वी एकनाथवाडी येथील ग्रामस्थांनी कृष्णा महाराजांना रथात बसवून ढोल-ताशे, टाळ-मृदंगाचा गजर आणि हरिनामाच्या जयघोषात भगवानगडावर आणले होते. त्यावेळी त्यांना निरोप देताना ग्रामस्थांचे डोळे पाणावले होते.

कृष्णा महाराज शास्त्री हे मूळचे तेलंगणातील असून, सुमारे १७ वर्षांपूर्वी ते भगवानगडावर आले. त्यांचे एम.ए.पर्यंत शिक्षण झाले आहे.

यंदा दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर कृष्णा महाराज शास्त्री यांना भगवानगडाच्या चतुर्थ महंतपदी गादीवर बसविण्याचा निर्णय विद्यमान मठाधिपती न्यायाचार्य डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्री आणि श्रीक्षेत्र भगवानगड ट्रस्टने घेतला होता. हा सोहळा भव्य स्वरूपात करण्याचे नियोजन होते. मात्र, यंदाची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सोहळा साधेपणाने करण्याचा निर्णय ट्रस्टने घेतला.

कार्यक्रम छोटेखानी असला तरी सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी भगवानगडाचे हजारो भक्त दसऱ्याच्या दिवशी गडावर उपस्थित होते. विद्यमान मठाधिपती डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांनी विधिवत धार्मिक पद्धतीने कृष्णा महाराज शास्त्री यांना भगवानगडाच्या गादीवर विराजमान केले.

कृष्णा महाराज शास्त्री यांची चतुर्थ महंत म्हणून नियुक्ती झाल्यानंतर न्यायाचार्य डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्री यांनी सामाजिक जीवनातून पूर्णपणे निवृत्ती घेतली आहे. यापुढे भगवानगडाच्या भक्तांनी



मठाधिपती ह.भ.प. महंत श्रीगुरू श्री. कृष्णा महाराज शास्त्री यांच्याशी संपर्कात राहावे, असे आवाहन करण्यात आले.

सामाजिक जीवनातून निवृत्त झाल्यानंतर डॉ. नामदेव महाराज शास्त्री आपले उर्वरित आयुष्य ज्ञानेश्वरीचा भावानुवाद लिहिण्यासाठी अर्पण करणार आहेत. संत भगवानबाबांनी पाण्यावर बसून ज्ञानेश्वरीचे वाचन केले होते आणि त्याच ज्ञानेश्वरीचा संपूर्ण भावानुवाद करण्याचे कार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री करीत आहेत, ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगण्यात आले. यापूर्वी डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांनी विविध ग्रंथांचे लेखन केले आहे. यापुढेही त्यांचे लेखन आणि ग्रंथनिर्मितीचे कार्य सुरूच राहणार आहे.

## निमगाव वाघा गावात रांगोळीतून स्वच्छतेचा जागर

**अहिल्यानगर । वीरभूमी -**

नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे नवरात्रोत्सव व विजयादशमीचे औचित्य साधून रांगोळीच्या माध्यमातून स्वच्छतेचा जागर करण्यात आला. रंगीबेरंगी रांगोळ्यांतून सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य आणि स्वच्छ गावाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या 'नवरात्री स्वच्छता उत्सवा'अंतर्गत स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. विजयादशमीनिमित्त खंडोबा मंदिराच्या सभामंडपात 'स्वच्छ गाव, सुंदर गाव', 'स्वच्छतेतून आरोग्य, स्वच्छतेतून समृद्धी' यांसह विविध संदेश देणाऱ्या रांगोळ्या साकारण्यात आल्या.

सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे, कचरा योग्य ठिकाणी टाकणे आणि स्वच्छतेच्या सवयी दैनंदिन जीवनात अंगीकारण्याचे आवाहन या माध्यमातून करण्यात आले. युवती दिपाली अंधारे हिने या रांगोळ्या साकारल्या.

संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम झाला. यावेळी माजी सरपंच साहेबराव बोडखे, डॉ. विजय जाधव, छबुराव काळे, सुनील काळे, मयूर काळे, सुरेश काळे, रामदास काळे, युवा मंडळाचे अध्यक्ष पै. संदिप डोंगरे, मंदाताई डोंगरे, प्रतिक्षा म्हसे, अचल काळे, वर्षा काळे, प्रिय काळे, अक्षदा मुसळे, माया काळे, रेशमा काळे, दिलीप काळे आदी उपस्थित होते. पै. नाना डोंगरे म्हणाले, स्वच्छता ही केवळ सणापुरती मर्यादित न राहता जीवनाचा अविभाज्य भाग बनली पाहिजे. नवरात्रोत्सव व विजयादशमीच्या माध्यमातून चांगल्या विचारांचा स्वीकार करण्याबरोबरच अस्वच्छता दूर करून स्वच्छ व सुंदर गाव निर्माण करण्याचा संकल्प करावा.

## कुकडीच्या पाणी व्यवस्थापनाचे वेळापत्रक जाहीर करा!

### रब्बी हंगामातील पहिले आवर्तन १० नोव्हेंबरला सोडण्याची मागणी

**निघोज । वीरभूमी-**

कुकडी प्रकल्पांतर्गत पाण्याचे योग्य व्यवस्थापन करून पाणी सोडण्याच्या आवर्तनाचे वेळापत्रक तातडीने जाहीर करावे, अशी मागणी पारनेर, जुन्नर, आंबेगाव, श्रीगोंदा आणि कर्जत-जामखेड या तालुक्यांतील पाणी वापर संस्थांच्या शिखर संस्थेचे चेअरमन शिवाजीराव डेरे यांनी केली आहे. कुकडी-नारायणगाव विभाग क्रमांक २ च्या अधिकाऱ्यांनी पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी आणि सदस्यांना पाण्याच्या नियोजनाबाबत स्पष्ट माहिती द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.



कुकडी-नारायणगाव विभाग क्रमांक २ च्या वतीने नारायणगाव येथे नुकतीच पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी व सदस्य यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत डेरे यांनी शेतकऱ्यांच्या पाणीविषयक प्रश्नांवर रोखठोक भूमिका मांडत आवर्तनाचे नियोजन तातडीने स्पष्ट करण्याची मागणी केली.

डेरे म्हणाले की, यंदा कुकडी प्रकल्पांतर्गत सर्व धरणांमध्ये ९५ टक्क्यांपेक्षा अधिक पाणीसाठा झाला आहे. ही ऐतिहासिक बाब आहे. मात्र, सुपर अल निनोच्या पार्श्वभूमीवर संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन राज्य सरकारने पाणी वापरावरील निर्बंध अधिक कडक केले आहेत. सरकारच्या या भूमिकेशी आम्ही सहमत आहोत. मात्र, त्यामुळे कुकडी डावा कालवा आणि कुकडी नदीच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

शेतकऱ्यांनी कोणती पिके घ्यावीत, पाण्याचे आवर्तन वेळेवर मिळेल का आणि हंगामात किती आवर्तने मिळणार, असे प्रश्न त्यांच्यासमोर आहेत. त्यामुळे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत कालवा सल्लागार समितीची बैठक लवकरात लवकर घेणे आवश्यक आहे, असे डेरे यांनी सांगितले.

रब्बी हंगामात शेतकऱ्यांना दोन आवर्तने द्यावीत. प्रत्येक आवर्तनाचा कालावधी ३० ते ३५ दिवसांचा ठेवावा, अशी मागणी डेरे यांनी केली. या नियोजनामुळे कांदा, हरभरा आणि गहू यांसारखी पिके घेण्याचे नियोजन शेतकऱ्यांना करता येईल. पाणी व्यवस्थापनाचा निर्णय झाल्यानंतर त्याची माहिती पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी, संचालक आणि शेतकऱ्यांपर्यंत तातडीने पोहोचवावी. त्यामुळे शेतकऱ्यांची संभ्रमावस्था दूर होऊन कमी पाण्यात आणि कमी कालावधीत घेता येणाऱ्या पिकांचे नियोजन करणे सोपे होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतीच्या पाण्याबरोबरच जनावरांच्या चाऱ्यासाठी स्वतंत्र आवर्तन देण्याची मागणीही डेरे यांनी केली. हिरवा चारा, मका आणि कडवळ यांसारखी चारा पिके घेण्यासाठी हे पाणी उपयोगी पडेल. त्यातून दुष्काळी भागातील जनावरांना चारा उपलब्ध करून देण्यास मदत होईल आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनाही दिलासा देता येईल, असे त्यांनी सांगितले. रब्बी हंगामातील पहिले पाणी आवर्तन १० नोव्हेंबर रोजी देण्यात यावे, अशी ठाम मागणी डेरे यांनी बैठकीत केली.

# सिमोल्लंघन, शस्त्र व शमीपूजनाने श्री रेणुकामाता देवस्थानातील नवरात्रोत्सवाची सांगता

### विजयादशमीला भगवान परशुरामाच्या पालखीची मिरवणूक । दिवसभर भाविकांची मोठी गर्दी

**शेवगाव । वीरभूमी-**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र अमरापूर येथील श्री रेणुका माता देवस्थानात उत्साहात सुरू असलेल्या नवरात्रमहोत्सवाची विजयादशमीच्या दिवशी मंगळवारी सायंकाळी पारंपरिक पद्धतीने सांगता झाली. भगवान परशुरामाच्या पालखीची मिरवणूक काढून सिमोल्लंघन करण्यात आले. त्यानंतर विधिवत शस्त्रपूजन आणि शमीपूजन करण्यात आले.

विजयादशमीनिमित्त सकाळी सात वाजता आईसाहेबांना दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी देवीची विविध फळांनी आकर्षक आरास करण्यात आली होती. सकाळी साडेदहा वाजता आखेगाव येथील श्री जोग महाराज संस्कार केंद्राचे प्रवर्तक राम महाराज झिंजुर्के यांचे हरिकीर्तन झाले. कीर्तनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. सकाळी साडेअकरा वाजता महानैवेद्य व महाआरती करण्यात आली.

भगवान परशुरामाच्या पालखीने सिमोल्लंघन

सायंकाळी साडेपाच वाजता भगवान परशुरामाची पालखी मिरवणूक काढण्यात आली. प्रज्ञेश भालेराव, रुद्रांश भालेराव आणि देवांश भालेराव यांच्या उपस्थितीत डॉ. प्रशांत भालेराव यांच्या हस्ते शस्त्रपूजन व शमीपूजन करण्यात आले.

त्यानंतर भगवान परशुरामाची पालखी देवस्थान परिसरातील शमी गणपती, महादेव, गुरुदत्त, महालक्ष्मी, तुळजाभवानी, विठ्ठल-रुक्मिणी, अनुसया माता व अत्री भगवान, परशुराम, जमदग्नी ऋषी, हनुमान, कालभैरव तसेच चंद्रकांतदादा महाराज समाधी मंदिर आदी ठिकाणी मिरवणुकीने नेण्यात आली. मिरवणूक आईसाहेबांच्या मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ आल्यानंतर कुसुमांड बळी देऊन पालखी मंदिरात नेण्यात आली.

सायंकाळी साडेसहा वाजता महाआरती, तर रात्री साडेआठ वाजता शेजारती करण्यात आली. त्यानंतर रविवार, दि. २५ रोजी होणाऱ्या



कोजागिरी पौर्णिमेपर्यंत आईसाहेबांना निद्रावास देण्यात आला. देवस्थानचे पुजारी वेदशास्त्रसंपन्न तुषार वैद्य आणि त्यांच्या ब्रह्मवृंदांनी पौरोहित्य केले.

विजयादशमी निमित्त आईसाहेबांच्या दर्शनासाठी दिवसभर भाविकांची मोठी गर्दी झाली होती. देवस्थानच्या वतीने दिवसभर महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली.

यावेळी भगवती भक्तानुरागी मंगलताई भालेराव, जयंती भालेराव, मनीषा भालेराव, डॉ. रेणुका भालेराव, गौरी भालेराव, रेणुकामाता परिवारातील चंद्रकांत चव्हाण, पाथर्डीचे प्रथम



नगराध्यक्ष सुभाष घोडके, प्रा. जनार्दन लांडे पाटील, डॉ. अरविंद पोटफोडे, श्रीमंत घुले, गणेश गरड, बाळासाहेब चौधरी, सरव्यवस्थापक अश्वलिंग जगनाडे, राजेंद्र नांगरे आणि प्रशासकीय अधिकारी कार्तिक मुनगंटीवार उपस्थित होते.

नवरात्रोत्सवाच्या आयोजनात राहुल वाघमारे, राजेंद्र कांबळे, कचरू आव्हाड, गौतम शिंदे, विनोद नागरे, गणेश मोरे, प्रमोद लबडे, विलासराव देशमुख, प्रकाश देशपांडे, भाऊराव वाघमारे, नंदाताई गरड, राजेंद्र न्यायपल्ले, विजय कवडे आणि रविंद्र एडके यांनी योगदान दिले.

SPOT NEWS



## अगस्ती विद्यालयात वाचन प्रेरणा दिन व वाचन सप्ताह उत्साहात

**● अकोले । वीरभूमी –**

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त अगस्ती विद्यालयात वाचन प्रेरणा दिन तसेच वाचन सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी पुस्तक परीक्षण, वक्तृत्व आणि प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वाचन, विचार, अभिव्यक्ती आणि सामान्यज्ञान कौशल्यांचे दर्शन घडविले. विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याबरोबरच पुस्तकांशी मैत्री वाढविणे, विचारशक्ती विकसित करणे आणि त्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थी– पुस्तक परीक्षण स्पर्धा– लहान गट : १. प्रार्थना रामचंद्र आवारी, २. नूतन गोपाल दराडे, ३. धनश्री संदीप दैने. मोठा गट : १. स्वरांजली सुयोग वाकचौरे, २. सारंगी चंद्रशेखर हासे, ३. लक्ष्मी संदीप दातखिळे. वक्तृत्व स्पर्धा : १. दिव्या प्रकाश साळवे, २. अन्विका प्रशांत वाकचौरे, ३. क्षितिजा रवींद्र मोरे. प्रश्नमंजुषा स्पर्धा – लहान गट : १. अन्विका प्रशांत वाकचौरे, २. गार्गी सचिन जाधव. मोठा गट : १. तन्मय निलेश भोजने, २. मैत्रेयी निलेश सहाणे. विद्यालयाचे ग्रंथपाल गणपतराव काळे यांच्या पुढाकारातून या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या सेक्रेटरी शैलेजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय शिंदे आणि पर्यवेक्षक विजय नाईकवाडी यांच्या उपस्थितीत यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त समर्थ प्रशालेत व्याख्यान सोहळा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेमध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त व्याख्यान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे पदाधिकारी आणि शालेय समितीचे चेअरमन आदरणीय श्री. सुरेश क्षीरसागर सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर, शालेय समितीचे चेअरमन सुरेश क्षीरसागर, संस्थेचे पदाधिकारी आणि शिक्षक प्रतिनिधी सौ. गीतांजली शेरकर उपस्थित होते. या प्रसंगी व्याख्याते गणेश पारधे व अथर्व ढोरकुले यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी महात्मा फुले यांचे शैक्षणिक योगदान, सामाजिक कार्य आणि समाजसुधारणेसाठी केलेले प्रयत्न यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर यांनीही महात्मा फुले यांच्या जीवनातील विविध प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# घटी बसलेल्या महिलांकडून पाणावलेल्या डोळ्यांनी मोहटादेवीला निरोप

### अष्टमीच्या होमहवनानंतर आठ दिवसांच्या अनुष्ठानाची सांगता । राज्यभरातील सुमारे तीन हजार महिला भाविकांचा सहभाग

**● पाथर्डी । वीरभूमी–**

'वर्षानुवर्षे तुझी सेवा घडू दे, तुझी कृपादृष्टी सदैव आमच्यावर राहू दे. आमच्या कुटुंबाला सुख, समृद्धी आणि भरभराट लाभू दे,' अशी मनोभावे प्रार्थना करत शारदीय नवरात्रोत्सवात घटस्थापनेपासून घटी बसलेल्या आणि खडा पहारा देणाऱ्या महिला भाविकांनी पाणावलेल्या डोळ्यांनी श्रीक्षेत्र मोहटादेवी गडाचा निरोप घेतला. अष्टमीच्या होमहवनाची पूर्णाहुती झाल्यानंतर आठ दिवसांच्या देवीसेवा आणि धार्मिक अनुष्ठानाची सांगता झाली. त्यानंतर जड अंतःकरणाने या महिला आपल्या घराकडे परतीच्या प्रवासाला निघाल्या.



पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र मोहटादेवी गड हे राज्यभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. शारदीय नवरात्रोत्सवात घटस्थापनेपासून अष्टमीच्या होमहवनाच्या पूर्णाहुतीपर्यंत अनेक महिला भाविक उपवास, घटी अनुष्ठान आणि खडा पहारा यांसारख्या धार्मिक परंपरांचे श्रद्धेने पालन करतात. यंदाही राज्याच्या विविध भागांतून आलेल्या सुमारे तीन हजार महिला भाविकांनी या धार्मिक अनुष्ठानात सहभाग घेतला.

नवरात्रोत्सवाच्या काळात पहाटे आणि सायंकाळच्या आरत्या, रात्री कीर्तन, देवीचे नामस्मरण, आठ दिवस गडाला प्रदक्षिणा, लोटांगण घालून देवीची आराधना, भजन तसेच आराधी महिलांच्या नृत्यात सहभागी होणे अशा विविध धार्मिक उपक्रमांत महिला भाविक तल्लीन झाल्या होत्या. उपवास आणि अनुष्ठानाचे नियम पाळत त्यांनी भक्तिभावाने देवीची सेवा केली. आठ दिवसांच्या या भक्तिमय वातावरणात परस्परांच्या सहवासातून त्यांना आध्यात्मिक समाधानही लाभले.

घटी बसलेल्या महिला भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी देवस्थान समितीच्या वतीने निवास, खिचडी, चहा तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. अष्टमीच्या दिवशी होमहवनाची पूर्णाहुती झाल्यानंतर महिलांनी देवीचे दर्शन घेतले. पुढील वर्षी पुन्हा देवीच्या सेवेसाठी येण्याची मनोमन इच्छा व्यक्त करत त्यांनी गडाचा निरोप घेतला.

पाचेगाव येथील जिजाबाई बर्डे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, दरवर्षी शारदीय नवरात्रोत्सवात आम्ही मोहटादेवी गडावर घटी बसतो. देवीच्या सेवेत आठ दिवस कसे निघून जातात, हे कळतही नाही. मोहटादेवीचे स्थान अतिशय जागृत असून, गेल्या आठ दिवसांपासून देवीची सेवा करण्याचे भाग्य लाभले. या सेवेतून मिळणारी ऊर्जा आम्हाला वर्षभर प्रेरणा देत राहते.

राहुरी येथील सुरेखा म्हसे म्हणाल्या, नवरात्रोत्सवाच्या महिनाभर आधीपासूनच मोहटादेवी गडावर येण्याची तयारी सुरू होते. पोळा सण झाल्यानंतर देवीच्या दर्शनाची ओढ अधिकच वाढते. आम्ही चार-पाच महिला एकत्र येऊन दरवर्षी गडावर येतो आणि नवरात्रोत्सवाचे आठ दिवस अनुष्ठान करतो. देवीच्या सेवेतून मनाला मोठे समाधान मिळते.

मंदाबाई जाधव (तांबेगाव), ताराबाई कोल्हे (रायमोह) आणि तुळसाबाई वीर (पैठण) यांच्यासह राज्याच्या विविध भागांतून आलेल्या अनेक महिला भाविकांनी या धार्मिक अनुष्ठानात सहभाग घेतला.

आठ दिवस देवीच्या चरणी सेवा अर्पण केल्यानंतर परतीच्या प्रवासाला निघालेल्या या महिलांच्या चेहऱ्यावर समाधान, मनात देवीभक्ती आणि पुन्हा गडावर येण्याची आस दिसून येत होती. मोहटादेवीच्या भक्तीत रमलेले मन, सेवेतून मिळालेली ऊर्जा आणि पुढील नवरात्रोत्सवाची ओढ घेऊन या महिला भाविकांनी गडाचा भावपूर्ण निरोप घेतला.

## भारदे विद्यालयाचे १४ व १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय खोखो स्पर्धेत पटकावले अजिंक्यपद



**● शेवगाव । वीरभूमी –**

बुऱ्हानगर (अहिल्यानगर) येथील बानेश्वर विद्यालयात संपन्न झालेल्या झालेल्या जिल्हास्तरीय खोखो स्पर्धेत येथील पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कुलच्या १४ व १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने अजिंक्यपद मिळवला आहे. हे संघ आता विभागीय स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

या दोन्ही संघाच्या कर्णधार श्रावणी शिरसाठ व ईश्वरी कोटुंबे यांच्यासह स्वरा नाईकवाडी, आराध्या राठोड, स्वामिनी साखरे, काव्या राठोड, स्वरा ढाकणे, धनश्री रनमले, आरोही ढाकणे, कल्याणी बुलबुले, सोम्या दौंड, गौरी खेडकर, स्वरा घुगे, आरुषी नाईक, स्वरा काळे, भक्ती खांबाट, वैष्णवी मार्कड, रुणाली प्रजापती, कार्तीकी नगरकर, गौरी खांबट, राजनंदिनी पन्हाळे, श्रधा राऊत, सानीका डाके, अबोली काथवटे, सिधी काळे, ज्ञानदा भडाईत, तनिष्क राठोड, तृप्ती व्यवहारे, देवीका मडकेफ शिवानी शेळके या खेळाडुंचा व मार्गदर्शक सचिन शिरसाठ यांचा संस्थेचे सचिव हरीश भारदे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

## वडगाव सावताळमध्ये स्वातंत्र्यानंतर प्रथमच एसटी बससेवा सुरू

**● पारनेर । वीरभूमी–**

तालुक्यातील वडगाव सावताळ येथे स्वातंत्र्यानंतर प्रथमच खामकर झापमार्गे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची (एसटी) बससेवा सुरू करण्यात आली. त्यामुळे वडगाव सावताळ, खामकर झाप आणि गाजदीपूर परिसरातील ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रवींद्र राजदेव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या बससेवेला मंजुरी मिळाली.



सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता पारनेर आगारात माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई निलेश लंके आणि पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बसला हिरवा झेंडा दाखवून या सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

वडगाव सावताळ, खामकर झाप आणि गाजदीपूर परिसरातील नागरिकांकडून अनेक दिवसांपासून एसटी बससेवा सुरू करण्याची मागणी केली जात होती. या भागातील वाहतुकीच्या अडचणींमुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत होते.

ग्रामस्थांची ही गरज लक्षात घेऊन रवींद्र राजदेव यांनी संबंधित प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर प्रशासनाने बससेवेला मंजुरी दिल्याने ग्रामस्थांची दीर्घ प्रतीक्षा संपली.

यावेळी बोलताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर म्हणाले, लोकप्रतिनिधींनी जनतेच्या मूलभूत समस्या सोडविण्याला प्राधान्य दिले पाहिजे. मात्र, तालुक्यात सामान्य माणसांच्या प्रश्नांवरही राजकारण केले जाते, ही दुर्दैवाची बाब आहे. जनतेच्या दैनंदिन अडचणी सोडविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज असल्याचे बेलकर यांनी सांगितले.

नवीन बससेवेमुळे परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रवास करणे सुलभ होणार आहे. तसेच ज्येष्ठ नागरिक आणि इतर प्रवाशांचीही गैरसोय कमी होण्यास मदत होणार आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील दळणवळणाला चालना मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला नेत्या सोनिया राजदेव, पारनेर आगार व्यवस्थापक अमोल कोतकर, रवींद्र कुस्कर, डॉ. बाळासाहेब कावरे, जिल्हा प्रवक्ते मोहनराव रोकडे, शिक्षक नेते संतोष खामकर, युवा नेते महेंद्र गायकवाड, बाळासाहेब मते, बलभीम कुंबडे आदी उपस्थित होते.

# 'आधी तोरण वेशीला, मग घराला'

### शिवदुर्गची ऐतिहासिक परंपरा नऊ वर्षांपासून कायम! । धर्मवीरगड, दिल्ली वेससह ऐतिहासिक वेशींना झेंडूच्या फुलांचे तोरण

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून चालत आलेल्या दसरा तोरण परंपरेचे जतन करत शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या शिलेदारांनी यंदाही विजयादशमीला ऐतिहासिक वेशींना झेंडूच्या फुलांचे तोरण बांधले. किल्ले धर्मवीरगड आणि श्रीगोंदा येथील ऐतिहासिक दिल्ली वेस व पानिपत शौर्य वेस येथे हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे यंदा नववे वर्ष होते.

विजयादशमीनिमित्त शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या वतीने श्रीगोंदा येथील दिल्ली वेस परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्यानंतर वेशीला झेंडूच्या फुलांचे तोरण बांधून ऐतिहासिक वारशाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. छत्रपती संभाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या किल्ले धर्मवीरगडाच्या वेशीला तोरण बांधण्यात आले. तसेच शौर्यस्तंभाचे पूजन करण्यात आले.

श्रीगोंदा तालुक्यातील ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या विविध गावांतील वेशींनाही तोरण बांधून पूजन करण्यात आले. पेडगाव येथे गोरख कदम, काष्टी येथे अमोल बडे, घारगाव येथे चेतन चौधरी व संभाजी चौधरी, तर पिसोरे खांड येथे दत्ताजी जरे यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

'आधी तोरण गडाला, मग घराला' आणि 'आधी तोरण वेशीला, मग दाराला' या संकल्पनेतून शिवदुर्ग परिवार गेल्या नऊ वर्षांपासून ही परंपरा जपत आहे. गावोगावच्या वेशी या पूर्वजांच्या शौर्याच्या, संस्कृतीच्या आणि वैभवशाली इतिहासाच्या साक्षीदार आहेत. नव्या पिढीला या ऐतिहासिक वारशाची ओळख व्हावी आणि त्याचे संवर्धन करण्याची प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

किल्ले धर्मवीरगड येथे तालुका संपर्कप्रमुख ईश्वर कोठारे व गोरख कदम, तसेच श्रीगोंदा येथील दिल्ली वेस परिसरात संवर्धन समितीचे अध्यक्ष दिगंबर भुजबळ, डॉ. चंद्रशेखर कळमकर, शिवकुमार गोसावी, जालिंदर पाडळे, मारुती वागसकर, ड. गोरख कडूस, सचिन भोसले, अमोल बडे, मिठू लंके, चेतन चौधरी, संभाजी चौधरी व शंभूराजे कडूस यांनी सहभाग घेतला.



### वेस ही आपल्या संस्कृतीची अभिमानाची निशाणी

■ गावोगावच्या वेशी वीरांच्या शौर्यगाथा सांगणाऱ्या आणि अनेक अभिमानास्पद घटनांच्या साक्षीदार आहेत. दसऱ्याला घराला तोरण बांधण्याची आपली संस्कृती आणि परंपरा आहे. मात्र, 'आधी तोरण वेशीला, मग घराला' या विचारातून पूर्वजांनी जपलेला ऐतिहासिक वारसा सन्मानित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. शिवदुर्गाची तरुण पिढी ही परंपरा जपत आहे, ही अभिमानाची बाब आहे.

– **राजेश इंगळे**, अध्यक्ष, शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# कोल्हार येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण

## शिवरायांच्या विचारांतून कोणत्याही संकटाला सामोरे जाण्याची प्रेरणा मिळते : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**कोल्हार । वीरभूमी –** कोणत्याही संकटाला सामोरे जाण्याची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांतून मिळते. उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श त्यांच्या कार्यातून मिळतो, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

कोल्हार येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, प्रवरा बँकेचे अध्यक्ष डॉ. भास्करराव खर्डे, सुरेंद्र खर्डे, अशोक असावा, राजेंद्र कुंकुलोळ यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते. जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून या शिवस्मारकासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला. तसेच, स्मारक समितीच्या वतीने दुष्काळ सहाय्यता निधीसाठी एक लाख रुपयांचा धनादेश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील म्हणाले की, महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पहिले स्मारक श्रीरामपूर येथे, तर दुसरे स्मारक कोल्हार येथे उभारण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची प्रेरणा आपल्या कृतीतून आणि त्यांच्या लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श प्रशासनातून दिसला पाहिजे, हीच या उपक्रमामागील भावना आहे.





छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा केंद्रबिंदू सामान्य माणूस होता. हाच विचार डोळ्यांसमोर ठेवून केंद्र आणि राज्य सरकार निर्णय घेत आहे. भारतीय नौदलाच्या ध्वजावर शिवमुद्रेचे बोधचिन्ह समाविष्ट करून ब्रिटिश गुलामगिरीच्या खुणा पुसण्याचे ऐतिहासिक काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील बारा गड-किल्ल्यांची युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत नोंद झाली. सामान्य माणसाच्या हितासाठी घेतल्या जाणाऱ्या निर्णयांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसते, असेही त्यांनी सांगितले.

शिवरायांचे स्मारक प्रत्येकाला आत्मविश्वास देते आणि त्यांच्या इतिहासातून प्रेरणा मिळते. मात्र, आज देशात काही घटकांकडून सुरू असलेल्या आंदोलनांकडे पाहता त्यांचा संविधान आणि संवैधानिक संस्थांना विरोध असल्याचे दिसून येते. त्यांची विचारधारा हिंदुत्वालाही विरोध करणारी असल्याचे मत मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केले.

राज्यात सध्या दुष्काळाचे मोठे संकट असून, अशा परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जलव्यवस्थापनाची आठवण होते. गड-किल्ल्यांवरील पाणवठे आणि त्यांनी निर्माण केलेले जलसाठे हे आजही मार्गदर्शक आहेत. उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर कसा करावा, याचा आदर्श महाराजांच्या कार्यातून मिळतो. कोणत्याही संकटाचा सामना करण्याची प्रेरणा त्यांच्या विचारांत आहे. सध्याच्या परिस्थितीत पाण्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी प्रत्येकाची असून, सरकारही योग्य नियोजन करीत आहे, असे मंत्री विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, सर्व धर्म, जाती आणि पंथांतील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन या स्मारकाची उभारणी केली आहे. या उपक्रमातून कोल्हार ग्रामस्थांनी सामाजिक एकतेचा आणि एकजुटीचा नवा आदर्श निर्माण केला आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भास्करराव खर्डे यांनी केले, तर सुरेंद्र खर्डे पाटील यांनी आभार मानले.

# ॲग्रीस्टॅकअंतर्गत ऑफलाइन फार्मर आयडी कार्ड अवैध

## शेतकऱ्यांच्या आधारसह जमीनविषयक माहितीचा गैरवापर होण्याची शक्यता

**पारनेर । वीरभूमी–** केंद्र सरकारच्या ग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत शेतकरी नोंदणीसाठी तयार करण्यात येणाऱ्या डिजिटल शेतकरी ओळखपत्राच्या (फार्मर आयडी) नावाखाली भौतिक अथवा ऑफलाइन कार्ड छापून वितरित करण्यास अधिकृत मान्यता नसल्याचे कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी स्पष्ट केले आहे. यासंदर्भात कृषी विभागाने राज्यातील सर्व विभागीय कृषी सहसंचालक आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना पत्र पाठवून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या निदर्शनास आले आहे की, काही राज्यांमध्ये आपले सरकार सेवा केंद्रे तसेच संबंधित संस्थांकडून शेतकऱ्यांना भौतिक स्वरूपातील किंवा ऑफलाइन फार्मर आयडी




कार्ड वितरित केले जात आहेत. मात्र, ॲग्रीस्टॅकअंतर्गत अशा कोणत्याही भौतिक अथवा ऑफलाइन कार्डला अधिकृत मान्यता देण्यात आलेली नाही, असे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

परवानगीशिवाय शेतकरी ओळखपत्र तयार करून त्याचे वितरण करणे ही गंभीर बाब असून, अशा कार्डांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कोणत्याही संस्था किंवा व्यक्तीला ॲग्रीस्टॅकअंतर्गत फार्मर आयडी कार्ड छापण्याची, वितरित करण्याची अथवा त्याच्या प्रती प्रसारित करण्याची परवानगी देण्यात आलेली नसल्याचे कृषी विभागाच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

> शेतकऱ्यांचे आधार कार्ड, आधारशी जोडलेला मोबाईल क्रमांक, जमिनीचा सातबारा (७/१२) व ८–अ उतारा तसेच जमिनीच्या गट क्रमांकाची माहिती खासगी व्यक्ती किंवा संस्थांकडे गेल्यास तिच्या गैरवापराची शक्यता आहे. या माहितीचा गैरवापर झाल्यास सायबर गुन्हे घडण्याची भीती असल्याने शेतकऱ्यांनी अधिकृत यंत्रणांकडून मिळणाऱ्या सूचनांचेच पालन करावे.
>
> **– भाऊसाहेब खेडेकर,** सामाजिक कार्यकर्ते

या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी ग्रामीण तसेच क्षेत्रीय पातळीवर शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी व्हॉट्सप संदेश, वृत्तपत्रे, दवंडी तसेच इतर उपलब्ध माध्यमांतून व्यापक प्रचार–प्रसिद्धी करण्यास सांगण्यात आले आहे.

कृषी आयुक्तालयातील संचालक (ॲग्रीस्टॅक) अंकुश माने यांनी यासंदर्भातील पत्र जारी केले आहे. या पत्राच्या प्रती अपर मुख्य सचिव (कृषी), अपर मुख्य सचिव (महसूल व वन), सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांना माहिती व तातडीच्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकच्या नावाखाली वितरित करण्यात येणाऱ्या कोणत्याही भौतिक कार्डाबाबत सतर्क राहावे. अधिकृत डिजिटल शेतकरी ओळखपत्रा संदर्भातील माहितीसाठी कृषी विभागाच्या अधिकृत सूचनांचाच आधार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कुलमध्ये नवरात्र महोत्सवानिमित्त युवतीसाठी पाच दिवसीय लाठी-काठी प्रशिक्षण संपन्न



**शेवगाव । वीरभूमी–** युवतींसाठी स्व–संरक्षण तसेच शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी लाठी काठी प्रशिक्षण आजच्या काळात आवश्यक असून मोठ्या संख्येने मुलींनी ही पारंपरिक कला आत्मसात करावी, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते उमेश भालसिंग यांनी केले.

संकल्प अभिनव भारत फाऊंडेशन,पुणे व पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कुल यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र महोत्सवानिमित्त युवतीसाठी आयोजित पाच दिवसीय लाठी–काठी प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले. त्याच्या समारोप सत्रात भालसिंग बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव हरीश भारदे, फाउंडेशनचे अध्यक्ष इंद्रजित देशमुख, नगरसेवक आशुतोष डहाळे, बाळसाहेब देशपांडे, डॉ कृष्णा देहादराय आदींसह पालक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते शिबिरात सहभागी मुलींना प्रमाणपत्रे देऊन सन्मानीत करण्यात आले. शिबिरातील सहभागी मुलींनी चित्तवेधक प्रात्यक्षिके सादर केली.

१३ ते १७ ऑक्टोबर या कालावधीत आनंदवनात आयोजित या शिबीरात शाळेतील ७५ मुलींनी सहभाग घेत प्रशिक्षण पूर्ण केले. प्रशिक्षक म्हणून सेन्सई विशाल गडकरी यांनी तर समन्वयक म्हणून साईनाथ गायके यांनी काम पाहिले. प्राचार्य उमेश घेवरीकर, प्रदीप बोरुडे, नितीन शेळके, सुरेश कुसळकर यांनी या शिबिराचे संयोजन केले.

# सैन्यदलात भरतीच्या आमिषाने ३४ लाखांची फसवणूक

## वडुले येथील १७ वर्षीय तरुणाला बनावट नियुक्तिपत्र व ई-मेल पाठवून गंडा । सातारा जिल्ह्यातून आरोपीला अटक

**पारनेर । वीरभूमी–** सैन्यदलात भरती करून देण्याचे खोटे आश्वासन देत तसेच बनावट ई–मेल आणि नियुक्तिपत्र पाठवून पारनेर तालुक्यातील वडुले येथील १७ वर्षीय तरुणासह इतरांची तब्बल ३४ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी पारनेर पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे. मोहन महादेव काकडे (रा. विठ्ठल मंदिराशेजारी, रुई, ता. कोरेगाव, जि. सातारा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सातारा जिल्ह्यात शोध घेऊन पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून, न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे.




या प्रकरणी वडुले येथील आरती रमेश सोनवणे (वय ३६, व्यवसाय शेती) यांनी १२ ऑक्टोबर रोजी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांचा १७ वर्षीय मुलगा आणि इतर साक्षीदारांची सैन्यदलात भरती करून देण्याचे आमिष दाखवून ही फसवणूक करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

फिर्यादीनुसार, आरोपी मोहन काकडे याने कर्नाटकातील बेळगाव येथील ११५ इन्फंट्री बटालियन (टीए) मराठा सेंटर येथील अधिकाऱ्यांशी ओळख असल्याचे भासवले. सैन्यदलात भरती करून देण्याचे आश्वासन देतानाच भरती न झाल्यास पैसे परत करण्याचेही त्याने सांगितले.

त्यानंतर आरोपीने टॅबच्या माध्यमातून बनावट ई–मेल आयडी तयार केले. या ई–मेलद्वारे संबंधित तरुणांची सैन्यदलात भरती झाल्याचे आणि प्रशिक्षणासाठी हजर राहण्याचे खोटे संदेश पाठवण्यात आले. तसेच, सही नसलेली बनावट नियुक्तिपत्रे तयार करून ती साक्षीदारांच्या व्हॉट्सप क्रमांकावर पाठवण्यात आली.

या बनावट संदेशांवर विश्वास ठेवून फिर्यादी आणि साक्षीदारांकडून आरोपीने आयडीबीआय बँकेतील वेगवेगळ्या खात्यांवर एकूण ३४ लाख रुपये घेतले. अशा प्रकारे सैन्यदलातील नोकरीचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणाचा तपास करताना पारनेर पोलिसांनी सातारा जिल्ह्यात शोधमोहीम राबवून १३ ऑक्टोबर रोजी आरोपी मोहन महादेव काकडे याला ताब्यात घेतले. त्याला पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कुलबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे, सफौ. जी. एस. डहाळे, पोलीस कॉन्स्टेबल डी. जी. अकोलकर, डी. एम. कैतके, दक्षिण मोबाईल सेलचे पोलीस कॉन्स्टेबल राहुल गुंड आणि पोलीस कॉन्स्टेबल अरुण सांगळे यांनी या कारवाईत सहभाग घेतला. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे करीत आहेत.

# राज्य केमिस्ट असोसिएशनच्या त्रैवार्षिक सभेसह निवडणुकीचे २३ व २४ ऑक्टोबरला शिर्डीत आयोजन!

**अहिल्यानगर । वीरभूमी–** महाराष्ट्र राज्य केमिस्ट एण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या त्रैवार्षिक सर्वसाधारण सभेसह निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरातील केमिस्ट भवन येथे नियोजन बैठक पार पडली. महाराष्ट्र राज्य केमिस्ट एण्ड ड्रगिस्ट असोसिएशनची त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर आणि शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी ‘साई पालखी निवारा’, निमगाव–निघोज, शिर्डी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण सभेस राज्यातील सर्व जिल्ह्यांतील सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता गाडळकर, सचिव आबासाहेब बेद्रे, खजिनदार प्रशांत उबाळे आणि सर्व जिल्हा कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथजी ऊर्फ अप्पासाहेबजी शिंदे आणि सचिव अनिल नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली ही त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. या सभेच्या नियोजनासाठी अहिल्यानगर शहरातील केमिस्ट भवन येथे आयोजित बैठकीत सभेचे नियोजन, राज्यभरातील सभासदांचा सहभाग आणि निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी अजित पारख, शशांक रासकर, चेतन कर्डिले, गणेश वाणी, भरत सुपेकर, मनिष सोमाणी, मनोज खेडकर आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य केमिस्ट एण्ड ड्रगिस्ट असोसिएशन ही राज्यातील औषध विक्रेते आणि औषध व्यवसायाशी संबंधित व्यावसायिकांचे प्रतिनिधित्व करणारी महत्त्वपूर्ण संघटना आहे. या संघटनेची त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा आणि निवडणूक ही राज्यातील औषध विक्रेता बांधवांच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. त्यामुळे या सभेकडे राज्यभरातील केमिस्ट बांधवांचे लक्ष लागले आहे.